# ख्रिश्चन मिशनाऱ्यांचे नाशिक जिल्हयातील शिक्षण प्रसाराचे कार्य

कैलास कारभारी खैरनार
कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, मानूर

१९ वे शतक हे प्रबोधनाचे शतक म्हणून ओळखले जाते. या शतकाला महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्राच्या इतिहासात विशेष महत्व आहे. याच शतकात सन १८१८ मध्ये पेशवाईचा अस्त झाला. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची राजकीय अधिसत्ता निर्माण झाली. भारतात इंग्रजांची सत्ता स्थिर होईपर्यंत समाज पुर्वीपासून चालत आलेल्या मध्ययुगीन रुढी परंपरा आणि चालीरिती यांच्या बंधनात अडकलेला होता. समाजातील जाती, पाती, उच्च–निच्च, स्पृश्य – अस्पृश्य श्रेष्ठ उच्च निच्च इ. भेदभावाच्या सिमा टोकाला गेल्या होत्या. मध्ययुगीन काळात बहुजन वर्गात अज्ञानाचा अंधकार पसरलेला होता. त्या काळात फक्त लढाई करणे अथवा शेती व पशुपालन करणे एवढेच बहुजन वर्गाला माहित होते. त्यामुळे धर्मग्रंथाचा अभ्यास करणारे पुराहित व बुध्दजीवी वर्ग सांगेल ते प्रमाण सत्य मानून वाटचाल चालू होती.

इंग्रज भारतात येण्यापुर्वी भारतात व महाराष्ट्रातील शिक्षणपध्दती प्रामुख्याने हिंदु पाठशाळा, आणि मुस्लीम मदरसे यांच्या पुरती मर्यादीत झालेली होती. हिंदुच्या पाठशाळेतून पारंपारिक धार्मिक शिक्षणाचे धडे दिले जात तर मदरशाततून पवित्र कुराणाच्या पाठांतरावर भर दिला जात होता. हिंदुच्या शाळांना पंतोजींच्याशाळा म्हणून ओळखले जात होते. महाराष्ट्रात सर्वांना उपयोगी होईल अशी शिक्षणपध्दती प्रचलित नव्हती. पेशवेकाळात सैनिकी, व्यावहारिक आणि धार्मिक अशा तीन स्वरुपात शिक्षण दिले जात होते. इंग्रजांची राजवट सुरु झाल्यावर पुर्वीच्या या शिक्षणपध्दती मोठया प्रमाणात बदल घडून आला. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचा सेवानिवृत्त अधिकारी चार्ल्स ग्रॅड व इतर इंग्रज अधिकाऱ्यांच्या प्रयत्नातून सन १८१३ मध्ये एक सनदी कायदा पास झाला. या कायदानुसार ईस्ट इंडिया कंपनीने भारतीय लोकांची शिक्षण विषयक जबाबदारी स्वीकारली होती. त्यानुसार कंपनी सरकारने दरवर्षी एक लाख रुपये आणि तीन पाद्री नेमावेत असे ठरविण्यात आले होते. त्याबरोबर या कायद्याने ख्रिस्ती मिशनऱ्यांना भारतात धर्म प्रसाराची मुभा देण्यात आली. इंग्रज सरकारच्या शिक्षण खात्याने क्षुद्र व अतिक्षुद्र याची शिक्षणाबाबत अपेक्षा केली असली तरी ख्रिश्चन धर्मोपदेकाच्या प्रयत्नाने त्यांच्या शिक्षणाने थोडी बहुत चालना मिळण्यास हातभार लागला होता. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात येशूचाशुभसंदेश त्यांना पोहचवायचा होता. आपला धर्मप्रसार हा धुर्ततेने व सावधानपणे केला पाहिजे, हे त्यांनी ओळखले होते. ख्रिश्चन मिशनाऱ्यांनी सन १८१५ मध्ये मुंबईत पाश्चात्य धर्तीयांवर श्शाळा सुरु केली. त्यानंतर दोन वर्षांनी मिशनाऱ्यांच्या शाळांची संख्या २१ एवढी झाली होती.

मुंबई शहरात सन १८२० पासूनच मिशन सोसायटीने अनेक शाळा सुरु केल्या होत्या. त्यांच्या शाळांमध्ये सर्वधर्मीय विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्यानंतरच्या काळात तत्कालिन मुंबई इलाख्यातील अहमदनगर, नाशिक, मनमाड औरंगाबाद अशा अनेक मोठया नगरामध्ये मिशनाऱ्यांनीश्शाखा संस्था स्थापन केल्या होत्या. पेशवाईच्या शेवटाबरोबर ब्रिटिश सेनापती मॅकडोवल याने १० एप्रिल १८१८ रोजी नाशिक सर केले. त्यावेळी नाशिक येथील सैनिक त्र्यंबकेश्वरला पळून गेले त्यामुळे तेथील जनता सिव्हीलकमिशनर कॅ. ब्रिग्ज यास शरण गेली. त्यांनी नाशिक ताब्यात घेतले इंग्रजांची राजवट सुरु होताच नाशिक शहरात कॉलऱ्याची साथ निर्माण झाली. रे गार्डन व रे मिचल नाशिक येथे आले सन १८३२ मध्ये रेव्हरंड जॉन डिक्शन मिशनरी नाशिकमध्ये आला. नाशिक मधील रविवार पेठेतील पेशवेवाडयात १३ जुलै १८३२ रोजी मिशनची स्थापना केली होती. त्यांनी धर्मप्रसार व शिक्षणप्रसाराला बरोबर सुरुवात केली. या इंग्रजीशाळेत सुरुवातीच्या

काळात फक्त १५ विद्यार्थी होते. सन १८५० मध्ये ही विद्यार्थी संख्या २५० पर्यंत वाढली होती. याच काळात येथे एक सरकारीशाळा सुरु झाली होती. परंतू त्यात फक्त ८०–९० विद्यार्थी होते.

ख्रिश्चन मिशनरी चर्च सोसायटीचे सहा अधिकारी १८ शाळा चालवत होते. त्यामधून १०० पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत होते. जेरम साहेब मनी याश्शाळाचे विभागप्रमुख होते. याच काळात राबर्टसन मॅडम यांनी अनाथाची शाळा चालविली होती. शाळेतून ३४० विद्यार्थी शिक्षण घेत होते नाशिकश्शहरात जानेवारी १८५३ मध्ये ग्रंथालय सुरु केले. यातून जनसामान्यपर्यंत ज्ञान पोहचविण्याचा त्यांचा हेतू होता.

भारतीय शिक्षण क्षेत्रात पडलेले महत्वाचे पाऊल म्हणजे वूडचा खलिता होय. भारतीय लोकांना युरोपातील आधुनिक ज्ञान उपलब्ध करुन देणे हे इंग्रज सरकारचे पवित्र कर्तव्य आहे असे चार्ल्स वूडच्या खलित्यात म्हटले आहे त्यांच्या शिफारशीनुसार मुंबई प्रांतात इ.स. १८५५ मध्ये स्वतंत्र शिक्षण खात्याची स्थापन करण्यात आली होती. त्या अनुषंगाने मिशन–यांनी सन १८५५ मध्ये नाशिक शहराच्या पश्चिमेकडील जागा खंडाने घेऊन शरणपूर वसाहत स्थापन केली. तेथे त्यांनी अनाथाश्रम व हस्तउद्योगाचे शिक्षण देणारी शाळा सुरु केली होती. या शाळेत सुतारकाम, लोहारकाम, शिंपीकाम आणि श्शेती विषयक शिक्षण दिले जात होते. तसेच शरणपूर येथे छापखाना सुरु केला होता. मुलांना स्वावलंबी करण्यासाठी काही उद्योगशाळा सुरु केल्या अशा प्रकार यांत्रिक शिक्षणाची पायाभरणी नाशिकमध्ये झाली होती. नाशिक येथील कॅनडा कॉर्नर व शरणपूर रोड येथील ख्रिश्चन चर्चने जिल्हयात व इतरत्र धर्म प्रसाराचे व इतर सामाजिक कार्य केले. त्यांनी शिक्षित उच्च वर्णियांचा नाद सोडून खेडयापाडयात आणि आदिवासी भागातील असंख्य निरक्षर लोकांकडे आपला मोर्चा वळविला. सन १८६१ मध्ये राज्याने सिनियर ॲग्लो व्हर्नाक्युलर स्कुल नाशिकमध्ये स्थापन केले होते. त्यानंतर सन १८७१ मध्ये या शाळेची रुपांतर नाशिक हायस्कुल असे झाले. नाशिक जिल्हयातील हे पहिले माध्यमिक विद्यालय होते. सन १८७८ नंतर नाशिक जिल्हयातील चांदवड, मालेगाव आणि त्र्यंबकेश्वर येथे आणखी शाळा सुरु झाल्या होत्या. यापैकी चांदवड येथील शाळेत उर्दु शिकविले जात होते.तर इतर ठिकाणच्या शाळा मराठी माध्यमातून शिक्षण दिले जात होते. नाशिक शहरात सन इ.स. १८८० मध्ये ९ सरकारी शाळा होत्या. त्या शाळा मधून एकूण १,१५४ विद्यार्थी होते. मालेगाव शहरात चार होत्या त्यात ३४७ विद्यार्थी शिकत होते. सिन्नर शहरात शाळा दोन होत्या. १२२ विद्यार्थी शिक्षण घेत होते या व्यतिरिक्त जिल्हयात १५८शाळा चालविल्या जात होत्या.

**मुलींची शिक्षण व्यवस्था**

१९ व्या श्शतकात भारतात मुलींच्या शिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टीकोन मागासलेला होता. मुलींच्या शिक्षणाचे केवळ नाशिक जिल्हयातच नव्हे तर मुंबई इलाक्यात देखील प्रमाण अत्यल्प होते. मुंबई प्रांतात इ.स. १८२४ मध्ये मुलींकरीता स्वतंत्र श्शाळा काढून स्त्री शिक्षणाचा पाया घातला गेला. नाशिक मध्ये मिसेस फेरार या स्त्रीने मुलींसाठीश्शाळा व वसतिगृह सुरु केले होते. सन १८६८ मध्ये नाशिक जिल्हयातील नाशिक शहर व येवला येथे मुलिंच्या दोन शाळा सुरु झाल्या होत्या यानंतर तिसरी शाळा सिन्नर येथे सुरु करण्यात आली होती. सन १८७८ नंतर नाशिक जिल्हयातील चांदवड, मालेगाव आणि त्र्यंबकेश्वर येथील शाळांमधून ३२१ मुली शिक्षण घेत होत्या. त्यामध्ये २७९ हिंदु, ४१ मुस्लिम आणि १ भिल्ल आदिवासी समाजातील मुलगी शिकत होती.

**सारांश :**

ख्रिश्चन मिशनाऱ्यांनी नाशिक जिल्हयात स्थापन केलेल्याशाळांचा जिल्हयातील अनेक गोर गरिबांना आधार मिळाला होता. कनिष्ठ शुद्रातीशुद्राच्या मुला मूलींना शिक्षणाची कवाडे उघडी झाली होती. याशाळांमधून शिक्षण घेणा–यांना पाठयपुस्तके, कपडे दिले जात. त्यामुळे त्यांच्या शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या वाढत गेली होती. शिक्षण केवळ उच्च वर्णियांनी घ्यावे. शुद्रतीशुद्रांनी मोल मजुरी करुन पोट भरण्याशिवाय गत्यंतर नाही हा न्युनगंड त्यांनी नाहीसा केला होता. ख्रिश्चन धर्मउपदेशकांचे विद्यादानाचे हे कार्य अप्रत्यक्षपणे हिंदु धर्मियांना उपयोगी पडले ख्रिश्चन मिशनाऱ्यांनी सुरु केलेल्याशाळांमध्ये पुस्तकी ज्ञानाबरोबर तांत्रिक शिक्षणाची पाया भरणी केली होती त्यामुळे विद्यार्थी स्वावलंबी होण्यास

अनेकांना आधार मिळाला होता या ज्ञानामुळे शिक्षित झालेल्या काही मध्यम वर्गीय तरुणांनी समाजसुधारणेच्या कार्यात सहभाग घेतला होता.

**संदर्भ :**

१. कुलकर्णी अ.स. १९७७ भारतीय स्वातंत्र्य आंदोलन, सुविचार प्रकाशन मंडळ सदाशिव पेठ, पुणे, आवृती प्रथम
२. गॅजेटिअर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, नाशिक १८८३ व्हॅल्युम–१६, बी गव्हर्नमेंट प्रेस.
३. शिरवाडकर वि.वा (संपादक) जीवनगंगा १९६४ नाशिक महानगरपालिका गेल्याश्शंभर वर्षातील वाटचाल, स्मरणिका
४. दिक्षित सदाशिव १९८८ डांगचा सिंह कर्मयोगी ना.म. तथा नानासाहेब दिक्षित यांचे चरित्र, साप्ताहिक मुद्रण, सदाशिव पेठ, पुणे आवृती–प्रथम
५. पवार जयसिंग २००१ हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, आवृती –तिसरी
६. पवार गो. मा. २००६ महर्षी विठ्ठल रामजी शिंदे जीवन कार्य, लोकवाङमयगृह मुंबई आवृती–तिसरी
७. फडके सुधीर १९७४ कर्मवीर काकासाहेब वाघ काल व कार्य, नाशिक जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाज नाशिक आवृती–प्रथम